आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१० मे २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- पश्चिम सीमेजवळ पाकिस्तानचे हल्ले भारतानं यशस्वीपणे रोखले
- युद्धस्थितीत पाकिस्तान जाणूनबुजून अफवांचा आधार घेत असल्याचा भारताचा आरोप
- भारतात  माता आणि बाल मृत्यूच्या दरात सातत्याने घट होत असल्याचा रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडियाचा अहवाल
- महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश दरम्यान तापी खोरे मेगा रिचार्ज प्रकल्पाच्या करारावर आज होणार स्वाक्षऱ्या

**आणि**

- प्रसिद्ध रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचं निधन

**<><><><><>**

पाकिस्तान सातत्यानं करत असलेली घुसखोरी आणि ड्रोन हल्ल्यांना भारतानं चोख प्रत्युत्तर दिलं आहे. भारतीय हवाई दलाच्या विमानांनी हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या शस्त्रांचा वापर करत पाकिस्तानच्या रफिक्की, मुरीद, चक्लाला, रहिमयार खान या ठिकाणची लष्करी केंद्रं, नियंत्रण केंद्रं, रडार आणि शस्त्रसाठ्यांवर हल्ले करत ती उद्धवस्त केल्याची माहिती आज नवी दिल्लीत झालेल्या विशेष वार्ताहर परिषद देण्यात आली. परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी, कर्नल सोफिया कुरेशी, विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ही वार्ताहर परिषद घेतली.

पाकिस्ताननं आज पहाटे दीडच्या सुमारास पुन्हा एकदा भूज, पठाणकोट, बठिंडा, उधमपूर, श्रीनगर आणि अवंतीपूर भागातली आरोग्य केंद्रं, शाळा, हवाई आणि लष्करी तळ तसंच नागरी वस्त्यांवर ड्रोन हल्ले करायचा प्रयत्न केला.

भारतीय लष्कारनं हे हल्ले यशस्वीरित्या परतवल्याची माहिती कर्नल कुरेशी यांनी दिली. तसंच भारतीय हवाई दलाचं सिरसा इथलं केंद्र उद्धवस्त केल्याचा पाकिस्ताननं केलेला दावा पूर्णपणे चुकीचा असून हे केंद्र पूर्ण क्षमतेनं सुरू असल्याचं सांगत त्यांनी तिथली आजची छायाचित्रं दाखवली. पाकिस्तान सीमाभागात मोठ्या प्रमाणात सैन्याची जमवाजमव करत असल्याचं यावेळी कुरेशी यांनी सांगितलं.

पाकिस्तानकडून होत असलेल्या या कारवाईला भारतीय हवाई दलानं तातडीनं प्रत्युत्तर दिलं. पाकिस्तानची रडार व्यवस्था आणि तांत्रिक तळ लक्ष्य करत ते उद्ध्वस्त केल्याची माहिती विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी दिली. भारतातले सुरतगड आणि सिरसा इथले हवाई दलाचे तळ तसंच एस-४०० ही हवाई सुरक्षा प्रणाली नष्ट केल्याचा पाकिस्तानचा दावा सपशेल खोटा असल्याचंही सिंग यांनी सांगितलं.

दरम्यान, सीमावर्ती भागात पाकिस्तानकडून सातत्यानं गोळीबार केला जात आहे. या गोळीबारात राजौरीचे अतिरिक्त जिल्हा आयुक्त राज कुमार थापा यांच्यासह दोन नागरिकांचा मृत्यू झाल्याची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी यावेळी दिली. पाकिस्तान सातत्यानं चुकीच्या बातम्या पसरवत असल्याचंही मिसरी यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

पाकिस्तानच्या कुरापती भारतानं रोखल्यामुळे पाकिस्तान डिजिटल माध्यमांवर अफवा आणि चुकीची माहिती पसरवत आहे. समाजमाध्यमांवर बनावट प्रतिमा, चित्रफिती प्रसृत करत पाकिस्तान माध्यमांची आणि लोकांची दिशाभूल करत आहे.

याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून

**व्हाईस कास्ट**

*पाकिस्तान ज्या पद्धतीनं त्यांच्या देशात दहशतवादाला खतपाणी घालत आहे, त्याच पद्धतीनं डिजिटल व्यासपीठावर बनावट बातम्या पसरवत आहे. भारताच्या चोख प्रत्युत्तरामुळं नैराश्यानं ग्रासलेला पाकिस्तान खोट्या बातम्यांचा प्रसार करत जनतेची, माध्यमांची दिशाभूल करत आहे. भारतीय सैनिकांना पकडल्याचे किंवा भारतीय संरक्षण प्रणाली नष्ट केल्याचा खोटा प्रसार पाकिस्तानी समाज माध्यमं आणि वाहिन्यांवर केला जात आहे. तसंच भारतीय प्रत्युत्तरामुळे पाकिस्तानचं झालेलं नुकसानही लपवण्याचा प्रयत्न होत आहे.*

*भारतीय महिला वायूदल अधिकाऱ्याला पकडल्याचा एक व्हिडिओ पाकिस्तानी समाजमाध्यमांवर पसरवला जात आहे. हिमालयीन क्षेत्रात तीन भारतीय फायटर विमानं पाडल्याचा बनाव २०१६ चं एक छायाचित्र दाखवून केला जात आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये एका फायटर जेटमधून भारतीय पायलटला ताब्यात घेतल्याचंही खोटं वृत्त पसरवलं जात आहे. तसंच भारताच्या ननकाना साहिब गुरुद्वारावर ड्रोन हल्ला केल्याचंही सांगितलं जात आहे. तसंच पाकिस्तानच्या सायबर हल्ल्यामुळे भारताचा ७० टक्के वीज पुरवठा बंद पडल्याचा बनावही केला जात आहे.*

अशा प्रकारचा कोणताही मजकूर आढळल्यास तात्काळ पत्र सूचना कार्यालयाला याची माहिती द्यावी, ८७९९७११२५९ या व्हॉट्सअप क्रमाकांवर किंवा socialmedia@pib.gov.in या मेलवर असा मजकूर पाठवावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

आकाशवाणी मुंबई केंद्रावरून प्रसारित होणाऱ्या काही बातमीपत्रांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. त्यानुसार दुपारी ३ चं प्रादेशिक बातमीपत्र ३ वाजून २० मिनिटांनी, रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणारं राष्ट्रीय बातमीपत्र ८ वाजून २० मिनिटांनी प्रसारित होईल. आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागाचा कार्यक्रम वृत्तविशेष आणि अर्थविशेष संध्याकाळी सव्वासात ऐवजी रात्री साडेआठ वाजता प्रसारित होईल. पुढील आदेश येईपर्यंत हे बदल कायम राहतील.

**<><><><><>**

शाश्वत विकास उद्दिष्ट २०३० ला अनुसरून, भारतात माता आणि बाल मृत्यूच्या दरात सातत्याने घट होताना दिसत आहे. रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडिया

ने जारी केलेल्या अहवाला नुसार, देशात दर एक लाख बालकांच्या जन्मा मागे माता मृत्युदर १३० इतका होता. तो आता कमी होऊन ९३ वर आला आहे.

बालमृत्यू दर देखील २०१४ मध्ये प्रति १००० जन्मांमागे ३९ होता, तो २०२१ मध्ये कमी होऊन २७ वर आला आहे.

२०१४ मध्ये नवजात शिशु मृत्युदर प्रति १ हजार २६ इतका होता, तो २०२१ मध्ये १९ वर आला.

पाच वर्षां खालच्या बालकांचा मृत्युदर २०१४ मध्ये दर हजार जन्मांमागे ४५ होता, तो २०२१ मध्ये ३१ वर आला.

नवजात बालकांमधलं लिंग गुणोत्तरही २०१४ मध्ये ८९९ होतं. त्यामध्ये सुधारणा होऊन २०२१ मध्ये ते ९१३ वर आल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळाची २८वी बैठक आज मध्यप्रदेशची राजधानी भोपाळ इथं होत आहे. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव उपस्थित असतील. जलविद्युत आणि जलसिंचन क्षेत्रातल्या प्रकल्पांवर बैठकीत चर्चा होईल. तापी खोरे मेगा रिचार्ज प्रकल्पाच्या सामंजस्य करारावर आज स्वाक्षऱ्या होणार आहेत. ही योजना जगातली सर्वात मोठी जल पुनर्भरण योजना असल्याचं मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी सांगितलं. महाराष्ट्रातली २ लाख ३४ हजार ७०६ हेक्टर जमीन तर मध्यप्रदेशातली १ लाख २३ हजार ८२ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पात कोणत्याही गावाचं विस्थापन होणार नाही असं यादव यांनी सांगितलं. ही योजना केंद्रसरकारच्या जलसिंचन योजनांमधे समाविष्ट करावी अशी वनंती आपण केंद्रसरकारला करणार असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

ज्येष्ठ रंगभूषाकार विक्रम गायकवाड यांचं आज  मुंबईत दीर्घ आजारानं निधन झालं. ते ६१ वर्षांचे होते. पानिपत, बेल बॉटम, उरी, दंगल, पिके यासारख्या गाजलेल्या चित्रपटांसाठी, तर पावनखिंड, फत्ते शिकस्त, शेर शिवराज यासारख्या ऐतिहासिक चित्रपटांसाठी त्यांनी रंगभूषाकार म्हणून काम केलं. विक्रम गायकवाड यांना सात वेळा राष्ट्रीय पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं. आज दुपारी मुंबईत दादर इथल्या स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

<><><><>

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र ६६ पदकांची कमाई करत पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. यात २४ सुवर्ण, २१ रजत आणि २१ कांस्यपदकांचा समावेश आहे. कर्नाटक ३८ तर राजस्थान २१ पदकांसह दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत.

<><><><>

शांघायमध्ये सुरु असलेल्या विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात भारताने आज तीन पदकं  जिंकली.भारतानं  मिश्र सांघिक स्पर्धेतही कांस्यपदक जिंकलं.

<><><><>

देशाच्या वायव्य, मध्य आणि पूर्व भागात आज वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता असून, ईशान्य भारतात अरुणाचल प्रदेशात आज, तर आसाम, मेघालय, मणिपूर, सिक्कीम आणि पश्चिम बंगालच्या पर्वत रांगांमध्ये उद्या जोरदार पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

//<><><><><>//